॥ आनंदाचा कंदहरी हा ॥

लेखक, पांडुरंगशास्त्री आठवले

कालनिर्णय, डिसेंबर १९९३

आकाशात मेघांचा गडगडाट होत आहे, वीज कडाडत आहे, मुसळधार पावसाने सर्वत्र पाणी झालेले आहे, भीषण अंधकाराने सर्व विश्व आच्छन्न झालेले आहे.अशा श्रावण वद्य अष्टमीला मुरली मनोहर कन्हैयाने या संसारात प्रथम पदार्पण केले. खरोखरच ज्या दिवशी त्रैलोक्यचालक आपले निर्गुण निराकार रूप सोडून सगुण साकार झाला तो दिवस विश्वाच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी अंकित करण्यासारखा नव्हे का?

जेव्हा जीवनात अंधकार दाटतो, निराशेचे उदास वातावरण पसरते, आपत्तींचा पाऊस पडतो, दुःख, दैन्याचे कृष्णमेघ धमकी देत गडगडाट करतात, मानव समाज अगतिक व किंकर्तव्यमूढ होतो त्यावेळी भगवान श्रीकृष्ण जन्म घेतो।

सर्वत्र व्याप्त अंधकारात जेव्हा प्रकाशकिरण दिसतात, उषःकालचा रवि जेव्हा स्वतःची आभा पसरवितो त्यावेळी कोणाचे हृदय आनंदाने पुलकीत होणार नाही? साम्राज्यवादाच्या चेंगराचेंगरीत चिरडल्या जाणार्या समाजाला जेव्हा तारणारा भेटतो, सत्ता व संपत्ती यांच्या शोषणापासून सोडवणारा मुक्तिदाता मिळतो, गरीब व उपेक्षितांना सहानुभूती दाखविणारे उबदार हृदय मिळते, पडलेल्याला उभा होण्यासाठी आसरा मिळतो आणि अध्यात्मात गटांगळ्या खाणार्याला एखादा उद्धारक मिळतो त्यावेळी आनंदविभोर होऊन कोण नाचणार नाही? मुक्तिदात्या, गीतेच्या उद्गात्या, लोकोद्धारक कृष्णाचा ज्यावेळी जन्म झाला त्यावेळी सर्व लोकं दुःख, शोक, उद्वेग, खिन्नता विसरून आनंदोल्लासात नाचले आणि तो दिवस, गोकुळाष्टमी म्हणून प्रसिद्धिस आला.

या भारतात अनेक अवतार झाले. या देशाला नररत्नांची परंपरा आहे. एकेका गुणासाठी, तत्त्वासाठी, ध्येयासाठी जीवनेच्या जीवने ह्या देशातील लोकांनी कुर्बान केलेली आहेत. अशा या भारतातील रत्नात शोभणारा कौस्तुभमणि म्हणजे श्रीकृष्ण! यशस्वी मुत्सद्दी, विजयीयोद्धा, धर्मसाम्राज्याचा संस्थापक विशुद्ध धर्माचा महान प्रचारक, भक्तवत्सल, ज्ञानियांचा राणा, सर्वांची जिज्ञासा पूर्ण करणारा जगद्गुरु गोपालकृष्ण या त्रैलोक्याचे अनंतकाळचे नेत्रदीपक भूषणच राहाणार आहे.

गोपालकृष्ण हा सर्व दृष्टींनी पूर्णावतार आहे. म्हणूनच त्याच्या विषयी " एतेचांशकलाः प्रोक्ताः कृष्णस्तु भगवान् स्वयम्" असे यथार्थत्वाने म्हटले जाते. त्याच्या जीवनात कोणत्याही ठिकाणी नावे ठेवायला जागा नाही. एकही स्थान असे नाही की जेथे उणीव दिसेल . आध्यात्मिक, सामाजिक, नैतिक किंवा दुसर्या कोणत्याही दृष्टीने पाहिले तरी कृष्णासारखा अलौकिक समाजोद्धारक दुसरा कोणीही झालेला नाही. कृष्णाची बरोबरी करील असा राजनीतिज्ञ या जगात कोठेही पाहायला मिळत नाही. अध्यात्म तर भगवान श्रीकृष्णाचेच. कृष्णाने निरपेक्ष राहून रात्रंदिवस संस्कृतीसाठी कार्य केले. रात्रंदिवस राजकारणात रमणारा निरपेक्ष राहूच शकत नाही पण फक्त याला कृष्ण हाच

अपवाद आहे.

कृष्ण म्हणजे " कर्षति, आकर्षति इति कृष्णः" जो खेचतो, जो आकर्षून घेतो तो कृष्ण, कृष्णाने गवळ्यांना एकत्र करून त्यांचे प्रेम संपादन केले. कृष्णाचे जीवन इतके सुंदर व सुगंधीत होते की जो कोणी त्याच्याकडे पाहील त्याला तो आपला वाटत होता. वृद्धांना स्वतःच्या मुलासारखा वाटत होता, तरुणांना मित्र वाटत होता, लहानांना आपल्यातलाच वाटत होता. तसेच तो भक्तांना स्वयं भगवान वाटत होता.

कृष्णाने सर्वांची हृदये जिंकलेली होती. त्याने सामान्य लोकांत आत्मप्रत्यय उभा केला, गवळ्यांत मिसळून त्यांना धर्मयुद्धाकरिता जागविले. त्याने गोकुळातील पापी विचारांच्या व दंभीवृत्तीच्या अघासुर, बकासुर आदींना कंठस्थान घातले. स्वतःच्या विषारी व विकारी विचारांच्या प्रचाराने यमुनेच्या आसपासच्या प्रदेशातील लोकांना त्रास देणार्या कालियाला ठार मारले.

लहानपणी कृष्ण घराघरांतून लोण्याची चोरी करून ते लोणी सर्व गोपाळांना वाटून देऊन मग स्वतः खात होता. त्यामुळे सर्व गोकुळ धष्टपुष्ट होते. लोणी म्हणजे नवनीत, सार, अर्क. प्रत्येक घरात जे साररूप असे, जे काही घेण्यासारखे गूण होते ते सर्व कृष्ण गोपाळबालकांजवळ प्रदर्शित करीत होता. असे घराघरातील व्यक्तीव्यक्तीतील लोणी तो सर्व गवळ्यांना खाऊ घालीत होता. त्यामुळे त्यांचे जीवन पुष्ट होत होते. याचा परिणाम अस झालेला होता की आतल्या आत होणारे, क्लेश, कलह, ईर्षा, द्वेष, खरेखोटेपणा यांचा मागमूसही गोकुळात उरलेला नव्हता. सर्व गोकुळवासीय प्रेमाने व समाधाने राहात होते।

कृष्णाने सामाजिक ऐक्य डोळ्यांपुढे ठेवून समाजाचे नियमन केले. दांभिक, खोटे, लुच्चे, स्वार्थी व भोगलंपट लोक आपले स्वजन होऊच शकत नाहीत, भले मग ते मामा, मावशी किंवा आत्या कोणीही असोत ते जोपर्यंत आपल्या सांस्कृतिक विकास कार्यात आडवे येत नाहीत तोपर्यंत त्यांना खुषाल कोपर्यात बसू द्या, पण आडवे आले तर शेंडी पकडून उडवून लावावे, हीच त्याची नीती होती.

श्रीकृष्ण दैवी संस्कृतीचा निःस्पृह, निरहंकारी व नम्र उपासक होता. संस्कृतीसाठी त्याचे आंतडे तुटत होते. म्हणूनच त्याने दुर्योधन, दुःशासन, शिशुपाल, जरासंध आदी जडवादी व आसुरीवृत्तींच्या लोकांचा हातात सुदर्शन घेऊन संहार केला व संस्कृतिप्रेमी पांडवांचा तो नेहेमीच मार्गदर्शक राहिला. अर्जुनाच्या रथाप्रमाणे त्यांचा जीवनरथही तोच सांभाळीत होता. अटीतटीच्या प्रसंगात व अतिशय वाईट काळात त्याने पांडवांना सावरलेले आहे.

श्रीकृष्णाने अर्जुनाच्या रूपाने विश्वाला गीतेसारखे अलौकिक तत्त्वज्ञान देऊन जगावर महान उपकार केलेले आहेत. गीतेत स्वमुखाने निष्काम कर्मयोग, स्थितप्रज्ञ दर्शन, गुणातीताचे वर्णन, पुरुषोत्तम, भक्तीचे विशुद्धरूप, शास्त्रीय मूर्तिपूजा, प्रगमनशील आदर्शवाद आदी अनेक विषयांवर आपल्या अलौकिक प्रतिभेने प्रकाश टाकून पुढे येणार्या हजारो पिढ्यांना अत्युत्कृष्ट मार्गदर्शन केलेले आहे.

श्रीकृष्णाचे जिवंत व तेजस्वी विचार कोणाही श्रोत्याला वा वाचकाला प्रेरणा देतील असेच आहेत. ते विचार झोपलेल्याला उठवून बसवितात. मेलेल्या व्यक्तीत चैतन्य भरतात, जीवनात निर्भयता आणतात, तसेच ते बेसूर जीवन झालेल्या व्यक्तींच्या जीवनात सुस्वर संगीत निर्माण करून जीवन हृष्ट, पुष्ट व तुष्ट करण्याची अद्‌भुत किमयाही घडवून आणतात।

आपण सारे कृष्णाचे उपासक आहोत. नसलो तर व्हायला हवे। कृष्णाचा उपासक कधीही रडका, निराश, उत्साहशून्य, प्रेम नसलेला, भावशून्य असूच शकत नाही. कृष्ण म्हणजे मूर्तिमंत चैतन्य, उत्साह, स्फूर्ती, जोश, उमंग! त्याने तुम्हा आम्हाला तसे जीवन जगून दाखवण्यासाठी अनेक संकटे सोसली. आज सारे जडवादाच्या प्रवाहात अतिशय वेगाने वाहात चाललेले आहेत. अशा वेळी त्यांच्यासमोर गीतेचा तेजस्वी जीवनवाद व श्रीकृष्णाचे स्फुर्तिदायक जीवनचरित्र ठेवण्याची अतिशय गरज आहे. यासाठी जीवन व्यतीत करणे हीच खरी कृष्णाची उपासना व तसे प्रामाणिकपणे प्रयत्न करणारेच खरे कृष्ण उपासक असू शकतात. शेवटी स्‍ स्‍

इंदीवर दलश्याम यशोदानंदनंदनम्‌ । स्वाध्यायि दैवनंवंद्यं कृष्णं वन्दे जगद्‌गुरुम्‌ ॥

असे म्हणून श्रीकृष्णाच्या चरणी विनम्रभावे नत होऊया.